दि हिंदुस्थान
को-ऑपरेटिव्ह
बँक लि. मुंबई

# The Hindusthan Co-Op. Bank Ltd., Mumbai

HEAD OFFICE : HORIZON TOWER, 1ST & 2ND FLOOR, JAI SHASHANK CO-OP. HSG. SOCIETY LTD.,
OPP. ATI, V.N. PURAV MARG, CHUNABHATTI, MUMBAI - 400 022. • Tel. No.: 022-24052121 / 2424 / 2525
Email : support@hindusthanbank.com • Website : www.hindusthanbank.com

## ५० व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

**(फक्त सभासदांसाठी)**

बँकेच्या सर्व सभासदांना कळविण्यांत येत आहे की, Covid-19 च्या प्रादुर्भावाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासन, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने दि. २५/०२/२०२१ रोजीच्या परिपत्रकानुसार नागरी सहकारी बॅकांना वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजनाबाबत दिलेल्या मार्गदर्शक सुचनानूसार व महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७५ (सुधारित) अन्वये आपल्या बँकेची ५० वी वार्षिक सर्वसाधारण सभा Video Conferencing(V.C.) Other Audio Visual Means (O.A.V.M.) द्वारे शनिवार दिनांक २७ मार्च, २०२१ रोजी सकाळी १०.३० वाजता बँकेचे मुख्य कार्यालय, होरायझन टॉवर, पहिला व दुसरा मजला, जय शशांक को. ऑप. हौसिंग सोसायटी लि. ए. टी. आय कार्यालयासमोर, व्ही. एन. पुरव मार्ग, चुनाभट्टी मुंबई - २२ येथे खाली दिलेल्या विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

### - सभेपुढील विषय -

१) दिनांक २१ सप्टेंबर २०१९ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून ते कायम करणे.
२) संचालक मंडळाने सादर केलेल्या दिनांक ३१ मार्च, २०२० अखेरच्या आर्थिक वर्षाच्या अहवालास तसेच वैधानिक लेखापरिक्षकांनी प्रमाणित केलेल्या ताळेबंद व नफातोटा पत्रकास मंजुरी देणे.
३) सन २०१९-२०२० या सहकारी वर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षकांच्या लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
४) सन २०१८-२०१९ च्या वैधानिक लेखापरिक्षण अहवालाच्या दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
५) संचालक मंडळाने केलेल्या नफ्याच्या विभागणीस अंतिम मान्यता देणे.
६) सन २०२०-२०२१ या सहकारी वर्षाकरिता बँकेच्या संचालक मंडळाने अंतर्गत तसेच कंकरंट लेखापरिक्षकांची नेमणूक केली आहे, त्यास अंतिम मान्यता देणे.
७) सन २०२०-२०२१ या सहकारी वर्षाकरिता वैधानिक लेखापरिक्षकांच्या नेमणूकीस अंतिम मान्यता देणे.
८) सन २०१९-२०२० या सहकारी वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी-जास्त झालेल्या उत्पन्न व खर्चास तसेच संचालक मंडळाने सुचविलेल्या सन २०२०-२०२१ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे.
९) उपविधी दुरुस्तीस मंजुरी देणे.
१०) सन २०२०-२०२१ मधील सभासद प्रशिक्षण कार्यक्रमास मंजुरी देणे व गतवर्षीचा आढावा घेणे.
११) वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असलेल्या सभासदांची रजा मंजूर करणे.
१२) मा. अध्यक्षांच्या अनुमतीने आयत्यावेळी येणाऱ्या विषयांचा विचार करणे.

संचालक मंडळाच्या आदेशावरुन
सही/-
**सुनिल सदाशिव पटवर्धन**
सरव्यवस्थापक

दिनांक : १२/०३/२०२१
मुंबई

### - विशेष सूचना-

१) गणसंख्ये अभावी सदर सभा तहकूब झाल्यास ती सभा त्याच ठिकाणी ठरलेल्या वेळेनंतर अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्या सभेस गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) कोणत्याही सभासदास बँकेच्या हिशेबा संबंधी काही अधिक माहिती हवी असल्यास अथवा काही विधायक स्वरुपाच्या सूचना करावयाच्या असल्यास अशा सभासदांनी दिनांक २२/०३/२०२१ पर्यंत बँकेच्या मुख्य कार्यालयाकडे कार्यालयीन वेळेत लेखी कळविणे अथवा admin@hindusthanbank.com या Email ID वर कळविणे आवश्यक आहे. जेणे करुन माहिती पुरविणे सुलभ होईल.
३) ज्या सभासदांनी रु.१,०००/- पेक्षा कमी रकमेचे भाग भांडवल घेतले आहे, त्यांनी आवश्यक त्या रकमेचा भरणा करुन किमान ४० शेअर्सची (एकूण रु.१,०००/- पर्यंत) रक्कम लवकरात लवकर पूर्ण करावी.
४) सभासदांनी आपला बदललेला पत्ता त्वरीत कळवावा.
५) सभासदांनी आपल्या वारसाची नोंद केलेली नसल्यास ती करुन घ्यावी.
६) ज्या सभासदांनी अद्यापपर्यंत आपले भाग दाखले घेतले नसतील, त्यांनी ते बँकेच्या मुख्य कार्यालय / शाखा कार्यालयातून घेऊन जावेत.